वृत्त पान ३ वर
पुणे, पिंपरी-चिंचवड
SMART पुरवणीसह अंकाची किंमत ४ रु.

# पुण्य नगरी

शुक्रवार, ३ मे २०१९
वर्ष : २० अंक : १७७ पाने १२+६ = १८

## सीबीएसई परीक्षेत पुण्यातील शाळांचे घवघवीत यश

**पुणे :** केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई बोर्ड) घेतलेल्या बारावी परीक्षेच्या निकाल गुरुवारी जाहीर केला. यामध्ये पुण्यातील अनेक शाळांनी मोठे यश संपादन केले आहे. सर्वच शाळांचा निकाल १०० टक्क्यांच्या जवळपास लागला आहे.

महंमदवाडी येथील दिल्ली पब्लिक स्कूलचेही सर्व १४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ७७ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळाले आहेत. १३० विद्यार्थ्यांना ८० टक्क्यांपेक्षा जास्त, तर १३३ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविले आहेत. स्कूलमध्ये शुभा मुखर्जी या विद्यार्थिनीने ९७.८ टक्के घेत प्रथम क्रमांक मिळवला आहे. दिघी येथील आर्मी पब्लिक स्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. या


श्रेयस सहारे


सुमेधा पंजा


स्पंदन घोष

स्कूलमध्ये साहिल मोहिते हा विज्ञान शाखेतून ९४.४ टक्के घेत प्रथम आला आहे. तर वाणिज्य शाखेत खुशी सचदेव ९२ टक्के घेत प्रथम, तर कला शाखेतून रम्या आर हिने ९१.८ टक्के प्रथम स्थान मिळविले आहे. तसेच, वानवडी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूलचा १०० टक्के ▶▶ पान ४ वर....

## सीबीएसई परीक्षेत पुण्यातील शाळांचे घवघवीत यश

निकाल लागला. यामध्ये श्रेयस सहारे याने ९६.४ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तर दुसरा क्रमांक सुमेधा पंजा हिने मिळविला असून, तिला ९६.२ टक्के गुण मिळाले आहेत. तर स्पंदन घोष याने ९६ टक्के गुण मिळवत तिसरा क्रमांक मिळवला. संस्कृती स्कूलच्या सर्व शाखेचा निकालही शंभर टक्के लागला आहे. आदित देशपांडे हा विद्यार्थी ९७.२ टक्के गुण टॉपर आला आहे. सिद्धार्थ मुंगळे हा ९३.२ टक्के घेत द्वितीय, तर स्नेहल कौशल ८८.८ टक्के घेत तृतीय क्रमांक मिळविला. सर्वच विद्यार्थ्यांना ७० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले आहे. डीएव्ही पब्लिक स्कूला निकालही १०० टक्के लागला आहे. उत्तीर्णामध्ये १०१ मुले आणि ११३ मुली असे एकूण २१४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. स्कूलची स्नेहा गोंडूकुपी या विद्यार्थिनीने ९७.६ टक्के प्रथम क्रमांक मिळवला. स्कूलमध्ये २४ विद्यार्थ्यांनी ९५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण, तर ९० ते ९५ टक्क्यांच्या दरम्यान गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या ६६ आहे. ६५ ते ७० टक्क्यांदरम्यान मिळालेल्या विद्यार्थी केवळ ५ एवढेच आहे. ऋतिक गोयल या दिव्यांग विद्यार्थ्यांने ८१.६ टक्के गुण मिळविले. तसेच उंड्री येथील वात्सल्य स्कूल, पत्रकारनगर येथील अशोक विखे-पाटील मेमोरिअयल स्कूल, जेएसपीएमच्या ब्लॉसम पब्लिक स्कूल, अक्षरा इंटरनॅशनल स्कूल, गोयल गंगा इंटरनॅशनल स्कूल अन्य शाळांचा निकाल १०० टक्क्यांच्या आसपास लागला आहे. ९० टक्क्यांहून अधिक निकाल असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे.